# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/ B 62660

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 01/06/2015

## परिपत्रक

**विषय :- परकीय गुंतवणूक असणा-या प्रकल्पांना वाटप केलेल्या भूखंडांना विकास कालावधी वाढविणेबाबत..**

संदर्भ : १. परिपत्रक क्र. मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/३३२२/२०१२, दिनांक १९.१२.२०१२

२. परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/२५९६६, दिनांक २२.०१.२०१३.

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये परकीय गुंतवणूक (FDI) आणणा-या उद्योगांना प्राधान्याने भूखंड वाटप करण्यात येते. अशा प्रकारच्या वाटप केलेल्या भूखंडांच्या विकासाकरीता प्रभाग (Zone) विचारात न घेता सरसकट दोन वर्षांचा कालावधी देण्यात येतो. तथापि, अशा उद्योजकांची उद्योगातील आर्थिक गुंतवणूक ही परदेशातून होत असल्याने आणि त्यांच्या होल्डींग/सबसिडयरी कंपन्याकडून आर्थिक सहाय्य उपलब्धतेमध्ये कालावधी जात असल्याने, तसेच मोठया प्रमाणात होणा-या बांधकामासाठी जास्त कालावधीची लागणारी गरज, त्याचबरोबर शासनाच्या विविध प्राधिकरणांकडून प्रकल्पासाठी आवश्यक असणा-या परवानग्या/ना हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी लागणारा कालावधी इत्यादीचा विचार करता परकिय गुंतवणूक आणणा-या प्रकल्पांसाठी वाटप केलेल्या भूखंडाचा विकास दोन वर्षांच्या कालावधीमध्ये करणे शक्य होत नसल्याने सदरचा विकास कालावधी वाढवून देणेसंबंधाने विषय महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. १४.०१.२०१५ रोजीच्या ३६० व्या सभेत सादर करण्यात आला होता. सदरहू विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ५४५५ पारित करण्यात आला आणि सदर ठरावामध्ये सुधारणा करुन परकीय गुंतवणूक आणणा-या प्रकल्पांना वाटप केलेल्या भूखंडांचा विकास करण्याबाबतचे सुधारीत धोरण पुढीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे-

१. महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये किमान १० कोटी रुपये पेक्षा जास्त परकीय गुंतवणूक (Project where FDI components is minimum 10 Crores) असणा-या प्रकल्पांकरीता प्राधान्याने वाटप केलेल्या भूखंडांकरीता प्राधान्याने भूखंड वाटपाचे धोरण आणि त्या भूखंडांचा विकास करण्यासंदर्भातील धोरणामध्ये बदल न करता फक्त भूखंड विकासाचा कालावधी ज्या प्रभागामध्ये (Zone) ३ वर्षांचा आहे त्या प्रभागामध्ये ३ वर्ष आणि ज्या प्रभागामध्ये (Zone) ४ आणि ५ वर्षांचा आहे त्या प्रभागामध्ये ४ वर्ष देण्यात यावा.

२. यापूर्वी परकीय गुंतवणूक असणा-या ज्या उद्योजकांना प्राधान्याने वाटप केलेल्या भूखंडाचा दोन वर्षांचा विकास कालावधी संपुष्टात आला आहे अथवा संपावयाचा आहे, अशा प्रकरणात वरील धोरणाचे अनुषंगाने उर्वरित शिल्लक कालावधी देण्यात यावा.

३. परकीय गुंतवणूक असणा-या उद्योजकांना भूखंडाचे हस्तांतरण करण्यात आले आहे अशा प्रलंबित प्रकरणात त्याचप्रमाणे अशा प्रकारे परकीय गुंतवणूक असणा-या उद्योजकांना यापूढे वाटप होणा-या तसेच हस्तांतरीत होणा-या भूखंडांकरीता सदरचे धोरण लागू राहील.

परकीय गुंतवणूक असणा-या उद्योजकांना प्राधान्याने भूखंड वाटपाचे धोरण आणि त्या भूखंडाचा विकास करण्याबाबतचे धोरण यामध्ये वरील बदला व्यतिरिक्त कोणताही बदल करण्यात आलेला नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(ए. एल. जऱ्हाड)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मऔविम, मुंबई**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई.